**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपिल क्रमांक २००९/४३८७/०२**

**श्री.हरिश्चंद्र गो.घोलप** **अपिलकर्ता**
**शिवाई हौसिंग सोसयटी सेक्टर ०४**
**प्लॉट नं. ४३८ रम नं.७ चारकोप**
**कांदिवली पश्चिम, मुंबई ४०० ०६७**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी**
**महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय,** **उत्तरवादी**
**बृहन्मुंबई विभाग, वरळी,मुंबई१३**

**जन माहिती अधिकारी**
**महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग, वरळी,मुंबई१३**

**-विवेचन-**

तक्रारीचा दिनांक : ५.१.२००९ व १२.१.२००९

सुनावणीचा दिनांक : ४.५.२००९

सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित होते व जन माहिती अधिकारी उपस्थित.

**अर्जदाराने दि.१२.१२.२००७ रोजीच्या अर्जान्वये आपण तपास अधिकारी सौ. कल्पना गाडेकर हया गैर अर्जदार पो.अबनावे यांना मदत करीत असल्याबाबत दि.१२.७.२००७ डि.सि.पी. आणि दि.२८.१०.२००७ ॲड सि.पी. यांजकडे तक्रार केली होती. तर त्यांची चौकशी केली आहे का? चौकशी केली असल्यास कारवाई केली आहे का ? तपास त्यांचे कडेच कसा ? तपासाला विलंब का ? तसेच गैरअर्जदाराची बॅंक लॉकर्स, बॅंक खाते त्यांची प्रॉपर्टी गोठविली आहे का ? गोठविली असल्यास त्यांनी भाडयाने दिलेल्या रुमची भाडे कोण घेत आहे ? या माहितीची मागणी केली होती.**

**त्यांनी मागितलेली माहिती ही उघड चौकशी क्र.१८/२००६ चे संदर्भात असल्याने व सदर चौकशी चालू स्थितीत असल्याने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती आपणांस कलम-८ (१) (एच) माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ तरतूदीनुसार दि.७ जानेवारी २००८ अन्वये नाकारलेली होती.**

सदर बाबत प्रथम अपिल दि.१५.१.२००८ रोजी दाखल केले होते. सदर अपिला संदर्भात, आपण मागितलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कलम ८(१) (एच) माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ अन्वेय नाकारली याचेशी सहमत असलेबाबत दि.६.२.२००८ रोजी तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केले.

या आदेशाविरुध्द कलेल्या दि.३.३.२००८ रोजीच्या व्दितीय अपीलाची सुनावणी दि.१ जून २००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित अर्जदारास आता असे कळविण्यांत आले आहे की, त्यांच्या दि.१२.७.२००७ व दि.२८.१०.२००७ रोजीच्या अर्जा संदर्भात सौ.कल्पना गाडेकर यांचेकडे चौकशी करण्यांत आली परंतू सदर चौकशीत आपण केलेल्या तक्रारीबाबत तथ्य आढळून आलेले नाही. सदरची उघड चौकशी क्र.१८/०६ मध्ये सध्या श्रीमती गाडेकर हया चोकशी अधिकारी नसून स.पो.आ. कैलास चव्हाण हे चौकशी अधिकारी आहेत. गैर अर्जदार यांची बॅक लॉकर्स, बॅक खाते व प्रॉपटी गोठविण्यांत आलेली नाही.

सुरुवातीला जरी चौकशी चालू असल्याने माहिती दिली नाही तरी तद्नंतर अर्जदारास आवश्यकती माहिती देण्यांत आलेली आहे, असे सुनावणीच्या वेळेला दिसून आले आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १ जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४०३/०२
अपिल क्रमांक २००९/४४०४/०२

श्री.रमेश कदम अपिलकर्ता
ए/१ नागनाथ कपाऊंड
गणेश चौक, काजपाडा,
बोरीवली पूर्व मुंबई ६६

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपसचिव
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग
विधी यो.२ मंत्रालय,मुंबई ३२

जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव उत्तरवादी
सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग
विधी यो.२ मंत्रालय,मुंबई ३२

-विवेचन-

वरील दोन्ही अपिलाची सुनावणी दि.१ जून २००९ रोजी ठेवण्यांत आली होती. त्यावेळी अपिलार्थीनी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यांत आलेली आहे व ती समाधानकारक आहे त्यामुळे दोन्ही अपिले रद्द देण्यांत यावी, अशी लेखी विनंती आयोगाकडे केलेली आहे. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

दोन्ही अपिले निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक १ जून २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३८९/०२

श्री.शबनम महम्मद सामीशेख — अपिलकर्ता
रुम नं. ३०१, ५१ एप्रिल शॉवर
सॉटर स्ट्रीट, भायखळा,मुंबई ४०० ००८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभिंयता(इ.प्र.)शहर — उत्तरवादी
भायखळा, (पश्चिम)मुंबई ४०० ०८
बृहन्मुंबई महानगरपालिका ई विभाग कार्यालय,
३ रा मजला, १० शेख इफिजुद्दिन मार्ग,

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इ.प्र. (शहर)-ाा
बृहन्मुंबई महानगरपालिका ई विभाग कार्यालय,
३ रा मजला, १० शेख इफिजुद्दिन मार्ग,
भायखळा, (पश्चिम)मुंबई ४०० ०८

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १६.४.२००९

सुनावणीचा दिनांक : ८.६.२००९

सुनावणीस अपिलार्थी व त्यांचे वकिल तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थी व त्यांचे वकिलाने संबंधित नस्तीची पाहणी करुन त्यांना हवी असणारी कागदपत्रे फी भरुन प्राप्त करुन घेतलेली आहेत. तरीही काही माहिती मिळालेली नाही असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. याबाबत अपिलार्थीस हवी असलेली माहिती व त्यावरील जन माहिती अधिकारी यांचे अभिप्राय पुढीलप्रमाणे आहे:-

| हवी असलेली माहिती | हव्या असलेल्या माहितीचा तपशिल | अपिलार्थीचे म्हणणे | अभिप्राय |
|---|---|---|---|
| 1.Copy of the plan | After amendments as on 1.12.2008 | Information received | आराखडे विहित शुल्क आकारुन देण्यांत आलेले आहे. |
| 2.Approved FSI | Total FSI approved in Sq.ft | Information yet not received | सदरची माहिती मंजूर आराखडयामध्ये आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| 3.Consumed FSI | Consumed FSI in sq.ft | Information yet not received | वरीलप्रमाणे |
| 4.Work certified | if any work certified by th BMC on `1.12.2008 | Information yet not received | कार्यारंभ प्रमाणपत्र देण्यांत आलेले आहे. |
| 5.List of the tenants | No.of tenants | Information yet not received | सदरची माहिती मंजूर आराखडयामध्ये आहे. |
| 6.Position of the C.C/O.C | Whether C.C./O.C.issued by the B.M.C. to the developers | Information yet not received | विकासकाम कार्यारंभ प्रमाणपत्र देण्यांत आलेले आहे. परंतू भोगवटा प्रमाणपत्र अद्याप देण्यांत आलेले नाही. |
| 7-Present position of the Building | 1.Period of the completion<br><br>2.Position of the illegal occupiers if yes, will you charge any penalty? If so what is the amount<br><br>3.As per your record the shop is existing or demolished | Information yet not received<br><br>Information yet not received<br><br>Information yet not received | विद्यमान भाडेकरुनी सदनिकाचा ताबा घेतला आहे.<br><br>त्याबाबत नियमाप्रमाणे योग्यतो दंड आकारला जाईल<br><br>स्थळावरील फक्त एक दुकान वगळता सर्व दुकाने तोडण्यांत आलेली आहेत. |

अर्जदाराने मागितलेली माहिती अर्जदारास देण्यांत आलेली आहे असेच सुनावणी अंती दिसून आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ८ जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३८८/०२

श्री.अरुण वसंत कोंडविलकर — अपिलकर्ता
लक्ष्मी कॉटेज, खोली क्र.८३ अ (पूर्व)
२ रा मजला डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड,
परेल, पूर्व, मुंबई ४०० ०१२

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त — उत्तरवादी
बृहन्मंबई महानगरपालिका जी/उत्तर विभाग कार्यालय,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर पश्चिम मुंबई २८

जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी
बृहन्मंबई महानगरपालिका जी/उत्तर विभाग कार्यालय,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर पश्चिम मुंबई

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १६.४.२००९

सुनावणीचा दिनांक : ८.६.२००९

सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती :-

अंतिम भूभाग क्र.६१६ (पार्ट)नगररचना क्रमांक - चार डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर, सेनापती बापट मार्ग, महाराष्ट्र कामगार केंद्राच्या मागे, एलफिस्टर मंबइ १३ येथील भूभागावर पारित केलेल्या परिशिष्ट-२ च्या माहितीबाबत.

अर्जदाराचे सर्व माहितीचे अर्ज व त्यानुसार देण्यांत आलेल्या माहितीचे विवेचन अपिलीय अधिका-याच्या आदेशात आहे.

सुनावणीच्या वेळेला अर्जदारानी त्यांना माहिती मिळाली असल्याचे मान्य केले. मात्र त्या प्रती प्रमाणित नसल्याचे सांगितले. अर्जदारास प्रमाणित प्रती पाहिजे असतील तर प्रमाणीत प्रतीचे शुल्क भरावे लागेल. मात्र सर्वसाधरण प्रत्येक प्रतीस रु.२/-शुल्क भरुन ती माहिती देण्यांत येते. अर्जदारास हव्या असलेल्या माहितीच्या प्रतीवर " माहितीचा अधिकार अधिनियमांन्वये दिलेली माहिती "असा स्टॅम्प मारुन माहिती देण्यास महापालिकेने नुकतीच सुरुवात केलेली आहे. अर्जदाराने एक तर प्रमाणित प्रतीचे आवश्यकते शुल्क भरावे व ते भरावयाचे नसल्यास दिलेल्या माहितीवर जन माहिती अधिकारी यांनी " माहितीचा अधिकार अधिनियमांन्वये दिलेली माहिती" असा स्टॅम्प मारुन देण्यांत यावा असे

निर्देश जन माहिती अधिकारी यांना देण्यांत आलेले आहेत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक ८ जून २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३९२/०२

श्री. समीर आर.शाह अपिलकर्ता
एस.व्ही.एम.इंजिनिअर्स प्रा.लि.
२६५, शिवशक्ती इंडस्ट्रीयल इस्टेट
ऑफ एम.व्ही.रोड.मरोळ,
अंधेरी (प), मुंबई ४०० ०५९

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभिंयता(इ.प्र.)शहर उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा पश्चिम मुंबई ४०० ०५०

जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, इ.प्र. (प.उप)एच वॉर्ड
बृहन्मुंबई महानगरपालिका, आर.के.पाटकर मार्ग,
बांद्रा पश्चिम मुंबई ४०० ०५०

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : १७.४.२००९

सुनावणीचा दिनांक : ८.६.२००९

सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास विकासकांनी एखादा स्ट्रक्चरल इंजिनिअर नेमल्यानंतर त्याला बदलून दुसरा स्ट्रक्चरल इंजिनिअर नेमण्याच्या बाबतीत महानगरपालिकेची भूमिका काय असेल याची माहिती विचारली होती व सल्ला मागितला होता व मागितलेली माहिती ही ' माहिती ' या संज्ञेतयेत नाही म्हणून माहिती देण्यास नकार देण्यांत आला होता व प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडील सुनावणीच्या वेळी अपिलकर्ते अनुपस्थित होते व अर्जदाराने मागितलेली माहिती ' माहिती ' या संज्ञेत मोडत नाही हा मुद्दा मान्य करुन अपिल निकाली काढण्यांत आले होते. त्याविरुध्दचे हे अपिल आहे.

अर्जदाराचा रोख अधिनियमाच्या कलम २ (एफ) मध्ये माहितीची व्याख्या देताना **Opinion Advises** असे लिहिले आहे म्हणून त्यांनी एखादया विषयावर मत/सल्ला मागू शकतात असे गृहीत धरुन वरील सल्ला मागितला आहे. माहिती अधिकार अधिनियमानुसार जर असे मत किंवा सल्ला जर अगोदरच अस्तित्वात असेल तर तो द्यावयाचा असतो. इतर बाबतीत मत किंवा सल्ला देणे हे बंधनकारक नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक ८ जून २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३००/०२

श्री. संदिप मनोहर देसाई — अपिलकर्ता
अे-४ व अे-६ उज्वल सोसायटी,
रोड नं.६ पांडूरंग वाडी, गोरेगांव पूर्व
मुंबई ४०० ०६३

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा प्रमुख वैद्यकिय अधिक्षक व — उत्तरवादी
खाते प्रमुख (मा.आ.से.)भाभा रुगणालय,
७ वा मजला, आर.के.पाटकर मार्ग,

जन माहिती अधिकारी तथा वैद्यकिय अधिक्षक,
डॉ. आर.एन.कपूर हॉस्पीटल,जुहू,मुंबई ५६

-विवेचन-

श्री.संदिप मनोहर देसाई यांनी आयोगाकडे दि.२७.२.२००९ रोजी सादर केलेल्या व्दितीय अपिलात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.१.२००९ रोजीच्या आदेशात असे नमूद केल्याप्रमाणे माहिती देण्यांत यावी असे निर्देश दि.२३.४.२००९ रोजीच्या आदेशाने देण्यांत आले होते. तसेच माहिती देण्यास उशिर केल्यामुळे शास्तीची कारवाई का करण्यांत येऊ नये?याचा खुलासा आयोगात समक्ष उपस्थित राहून करण्यांत यावा असे सांगण्यांत आले होते. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी दि.९.६.२००९ रोजी आयोगासमोर उपस्थित राहून पुढीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

अर्जदार श्री. संदीप मनोहर देसाई यांनी त्यांच्या दि.२३.१०.२००८ च्या (दि.२५.१०.२००८रोजी कार्यालयात प्राप्त झालेल्या )अर्जान्वये त्यांच्या स्वतःच्या प्रकरणात निदानाप्रमाणे राईट हेमिपरेसिस ही त्यांना झालेली इजा आणि त्यांची ही इजा साधी की दुःखकारक स्वरुपाची आहे हे स्पष्टपणे नमूद केलेले इंज्युरी सर्टिफिकेट देण्याची मागणी केली.

श्री. संदीप देसाई यांना त्यांची मागितलेल्या माहितीबाबत आणि त्यांना द्यावयाच्या सर्टिफिकेट देण्याबद्दल कळविणारे पत्र क्र.एचओ/११५०५/आरएनसीएच दि.१८.११.२००८ रोजी कुरिअरव्दारा पाठविण्यांत आले. सदर पत्र त्यावर लिहिलेल्या अर्जदाराच्या नावातील फरकामुळे परत आले. त्यानंतर पुन्हा ते पत्र दि.२४.११.२००८ रोजी प्रमाणित डाकेने (अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींग)पाठविण्यांत आले. सदर पत्रानुसार श्री. संदीप देसाई सर्टिफिकेट घेण्यांत आले नाहीत.

श्री. संदीप मनोहर देसाई यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे केलेल्या त्यांच्या दि.२.१२.२००८ च्या अपिलाच्या सुनावणीनंतर प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांच्या दि.२८.१.२००९च्या निवाडयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास इंज्युरी ग्रीवियन्स किंवा सिंपल नमूद केलेले इंज्युरी सर्टिफिकेट ट्रीटींग डॉक्टर्सच्या ओपिनियनसह द्यावे असे निर्देश दिले.

रुग्णालयातील मानद भिषक (ऑनररी फिजिशियन)यांनी दिलेले सर्टिफिकेट तयार असून ते घेऊन जावे असे श्री.संदीप देसाई यांना क्र.एचओ/१८११२/आरएनसीएच या पत्रान्वये दि.३.२.२००९ रोजी कळविण्यांत आले.

श्री.संदीप देसाई हे दि.१८.२.२००९ रोजी कूपर रुग्णालय येथे स्वत:हजर झाले तेव्हा तयांना सर्टिफिकेट क्र.०००११०० व त्याबरोबर त्यांच्या आंतररुग्ण प्रकरणाच्या अभिलेखाच्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रती देण्यांत आल्या. अशा प्रकारे रुग्णालयाच्या अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती व मानसेवी भिषक यांनी दिलेले सर्टिफिकेट अर्जदार/अपिलार्थी यांना देण्यांत आलेले आहे.

श्री.संदिप देसाई यांनी अर्ज सादर केल्यानंतर विहीत मुदतीत (३० दिवसांत)त्यांना द्यावयाचे सर्टिफिकेट देण्याबद्दल व मागितलेल्या माहितीबाबत पत्राव्दारे कळविण्यांत आले. त्यांनी व्यक्तिश: येऊन सदर प्रमाणपत्र घेतले नाही. त्यांनी प्रथम अपिलीय अधिका-याकडे अपील दाखल केल्यावर दि.२८.१.२००९ रोजी अपीलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे माहिती सात दिवसांत देण्याकरिता त्यांना दि.३.२.२००९ रोजी कळविण्यांत आले. दि.१८.२.२००९ रोजी ते व्यक्तिश:हजर झाल्यावर मानसेवी भिषक यांनी दिलेले प्रमाणपत्र व त्याचबरोबर श्री. संदीप देसाई यांच्या आंतररुग्ण प्रकरणातील अभिलेख/कागदपत्राच्या प्रती त्यांना देण्यांत आल्या.

श्री.संदीप देसाई अर्जदार/अपिलार्थी यांनी अर्ज केल्यावर/अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेल्या निवाडयानुसार विहीत मुदतीत त्यांना माहिती देण्याबाबत कळविण्यांत येऊन अर्जदार व्यक्तिश: हजर झाल्यानंतर त्यांना उपलब्ध माहिती/प्रमाणपत्र देण्यांत आले. यास्तव माहितीचा अधिकारी अधिनियम २००५ च्या कलम २० अन्वये माझ्यावर शास्तीची कारवाई करण्यात येऊ नये अशी विनम्र प्रार्थना आहे.

वरील खुलासा समाधानकारक वाटत असल्यामुळे शास्तीची कारवाईचे आदेश नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ९ जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४३९५/०२

श्री.विजय शंकर यादव — अपिलकर्ता
अे-७/५०३, वैभव को.हॉ.सो.
आनंदनगर, सी.एस.रोड,
दहिसर पूर्व, मुंबई ४०००६८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता — उत्तरवादी
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१

जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी-४
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१

-विवेचन-

अपिलाचा दिनांक : ८.४.२००९

सुनावणीचा दिनांक : ९.६.२००९

सुनावणीस अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

प्रथम अपिलीय आदेशात दि.५ फेब्रुवारी २००८ रोजी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी संबंधितांकडून यादी मिळवून घेऊन अर्जदारास द्यावी, असे निर्देश जन माहिती अधिकारी यांनी दिलेले होते. दोन्ही बाजूच्या प्लॅनची प्रत मिळाली मात्र लिस्ट न मिळाल्याने आयोगाकडे अपिल करण्यांत आले. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळेला याबाबत पुढीलप्रमाणे खुलासा सादर केला आहे :-

श्री. विजय शंकर पवार यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दिनांक २४.९.२००८ चे अर्जान्वये साईधाम को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. इमारत क्रमांक २ व लक्ष्मी को.ऑफ हौसिंग सोसायटी नियोजित इमारत क्रमांक ७ च्या सदनिका/दुकाने वाटपाबाबतची माहितीची मागणी केलेली होती. सदर संस्थांचे सदनिका/दुकाने वाटपांचे यादीची मागणी केलेली होती. तथापी सदर संस्थांची सदनिका/दुकाने यांचे वाटप संबंधीत संस्थांनी परस्पर केले असल्याने सदरची माहिती या कार्यालयात उपलब्ध नसून ती संस्था पातळीवर असल्याने संबंधितांनी ती संस्थेकडून प्राप्त करुन घ्यावी असे दि.१५.१०.२००८ चे पत्रान्वये कळविलेले होते. परंतू अर्जदार अपिलात गेले असता प्रथम अपिलीय अधिकारी तथा सचिव, झो.पु.प्रा. यांनी त्यांचे दिनांक ६.२.२००९ चे आदेशाने असे कळविले होते की, कमर्शियल गाळयाबाबत अर्जदाराने अभियांत्रिकी विभाग, झो.पु.प्रा.शी संपर्क साधावा आणि सदनिका वाटपा यादीबाबत शासकीय माहिती अधिकारी यांनी संबंधित संस्थेकडून सदनिका वाटपाची यादी उपलब्ध करुन अर्जदारास देण्यांत यावी. त्यानुसार या कार्यालयाने संबंधीत संस्थेशी संपर्क साधला असता संबंधीत संस्थेकडून अशी माहिती मिळाली की, साईधाम एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था. मर्या. विलेपार्ले (पूर्व)सहार रोड, अंधेरी, मुंबई ४०० ०६९ च्या इमारत क्रमांक २ मधील सदनिकांचे संबंधीत संस्थेने परस्पर वाटप केलेले आहे. सबब साईधाम एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. या संस्थेकडून पाठपुरावा केला असता त्या संस्थेकडून प्राप्त झालेली सदनिका वाटपाची यादी अर्जदार श्री.विजय शंकर पवार यांना दि.१७.३.२००९ चे पत्रान्वये या कार्यालयातून घेऊन जाणेकरिता कळविले होते. परंतू अर्जदार हे या कार्यालयास न आल्याने या कार्यालयाने दि.४.६.२००९ रोजी हस्तबटवडयाने दिलेली आहे.

लक्ष्मी एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्था नियोजित इमारत क्रमांक ७ मध्ये चौकशी केली असता असे समजले की, सदर संस्थेची गृहनिर्माण संस्था नोंदणी झालेली नसून संबंधीत सदनिका धारकांनी त्या मधील सदनिकांचे परस्पर वितरण करुन घेतले असून सदनिका वाटपाबाबत कोणतीही यादी त्यांचेकडे नाही. सबब त्यांचेकडून सदनिका वाटपाची यादी उपलब्ध न झाल्याने अर्जदारास सदनिका वाटपाची यादी उपलब्ध करुन देता आली नाही.

माहितीच्या अधिकारांतर्गत अर्जदाराने केलेल्या अर्जानुसार वेळोवेळी कार्यवाही करुन या कार्यालयाने संबंधीत संस्थेकडून प्राप्त केलेली माहिती अर्जदारास निशुल्क स्वरुपात या कार्यालयातून घेऊन जाण्याकरिता या कार्यालयाचे दि.१७.३.२००९ च्या पत्रान्वये कळविलेले होते परंतू अर्जदार सदरची माहिती घेऊन जाण्याकरिता न आल्याने या कार्यालयाने दि.३०.५.२००९ रोजीच्या पत्रान्वये दि.४.६.२००९ रोजी माहिती हस्तबटवडयाने दिलेली असून त्याची पोहोच आपले माहितीसाठी सोबत सादर करण्यांत येत आहे.

संस्थेच्या झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाने पुर्नवसनाचे फ्लॅटचे कशा प्रकारे वाटप व्हावे यासाठी एस.आर.ए.ने मार्गदर्शक तत्वे निश्चित करुन दिलेली आहेत. मात्र लक्ष्मी एसआरए सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांनी परस्पर वाटप करुन घेतलेले आहे व त्याची यादी एस.आर.ए.कडे उपलब्ध नाही ही गोष्ट निश्चितच अयोग्य आहे. तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी, एसआरए यांना असे निर्देश देण्यांत येत आहेत की, याबाबत एसआरए स्कीमबाबत फ्लॅटधारकांना झालेले वाटप याबाबत एसआरए कडे व सोसायटीकडे रेकॉर्ड असणेही आवश्यक आहे. या दृष्टीने त्यांनी सचिव वरिष्ठ अधिकारी यांचे मार्फत संबंधित सोसायटीकडन वरील बाबीची पूर्तता करुन घ्यावी व जन माहिती अधिकारी यांनी ४ आवठडयाच्या आत माहिती द्यावी.

वरील प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वत: लक्ष घालावे,असेही निर्देश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल मान्य  करण्यांत येत आहे . मुख्य कार्यकारी अधिकारी झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरण यांना या आदेशाची प्रत पाठविण्यांतयावी व त्यांनी या आदेशाचे पालन मुदतीत होईल याची दक्षता घ्यावी

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक ९ जून  २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)  अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२८५/०२

श्री.लक्ष्मी दिलीप लालका अपिलकर्ता
१०१ शिल्पी ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड
इंद्रप्रस्थ पार्क, पारिजात बिल्डिंग ओपोझिट
ऑफ ९० फीट रोड, मुलूंड (पूर्व)
मुंबई ४०००८१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उपमुख्य अभियंता(इमारत प्रस्ताव) उत्तरवादी
पुर्व उपनगरे बृहन्मुंबई महानगरपालिका,
राज लेगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,
विक्रोळी पूर्व, मुंबई ८३

जन माहिती अधिकारी तथा माहिती अधिकारी-४
पुर्व उपनगरे बृहन्मुंबई महानगरपालिका,
राज लेगसी जवळ, पेपर मिल कंपाऊंड,
विक्रोळी पूर्व, मुंबई ८३

-विवेचन-

अर्जाचा दिनांक ३०.१०.२००९ रोजी
माहिती दिल्याचा दिनांक  २१.११.२००८दि.६.११.२००९ दि.२१.२.२००९
प्रथम अपिलाचा दिनांक १६ मार्च २००९
प्रथम अपिलाच्या निर्णयाचा दिनांक   २४.३.२००९
व्दितीय अपिलाचा दिनांक ९.४.२००९
सुनावणीचा दिनांक ७.५.२००९
अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदाराला त्यांच्या सोसायटीच्या पुर्नविकास प्रकल्पासाठी विकासकास **Intimation of Disapproval** दिलेली होती. त्यात नमूद केलेल्या ४७ मुद्यांच्या पूर्ततेबाबतची माहिती पाहिजे होती. अर्जदारास त्यांना हवी असलेली माहिती दिलेली आहे त्यांनी संपूर्ण नस्तीची पाहणी केलेली दिसते. माहितीचा अधिकार यामध्ये नस्तीमध्ये जशी माहिती जशी रेकॉर्डमध्ये उपलब्ध असेल त्याप्रमाणे ती द्यावयाची असते. अर्जदाराला वाटले तर **Commcncement Certificate** देताना **Intimation of Disapproval** मुद्दयाचा परामर्श घेताना ज्या नोटशीट आहेत व त्या नोटशीटच्या त्यांना ज्या प्रती देण्यांत आलेल्या असतील त्यातून समजावून घेता येईल. तसेच अपिलीय अधिका-याने आयोगाला दिलेल्या पत्रानुसार दि.२१.२.२००९ रोजीच्या पत्रात **IOD** मध्ये दिलेल्या शर्तीच्या पूर्ततेच्या बाबतीत सुध्दा पत्र पाठविण्यांत आलेले आहे. जर दिलेल्या माहितीने समाधान झालेले दिसून येत नाही असे वाटल्यास त्या नस्तीचे पुर्न परिक्षण करायला देणे हा यावरील सर्वोत्तम उपाय राहू शकतो. जेणेकरुन कागदपत्रात उपलब्ध असलेली माहिती देण्यांत आलेली आहे याची खात्री अर्जदारास करुन घेता येईल. अर्जदारास असे वाटत असेल की, काही अटी व शर्तीचा परामर्श हा **Commcncement Certificate** देताना घेण्यांत आलेली नाही, तर ही बाब प्रशासकिय दृष्टया महापालिकेच्या आयुक्ताच्या निर्देशनास आणून द्यावी. ती बाब ' माहितीचा अधिकार अधिनियम या खाली ' येत नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ११ जून २००९

**मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपिल क्रमांक २००९/४३६८/०२**

**श्री.अकबर चांद मोमीन** **अपिलकर्ता**
**रुम नं.३५३/१/२ फूलवाली गली**
**९ वी लेन, बेहराम नगर, बांद्रा इस्ट**
**मुंबई ४०० ०५१**

**प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त** **उत्तरवादी**
**झोन-९ वांद्रे (पश्चिम)मुंबई ५०**

**जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलिस**
**आयुक्त, पश्चिम प्रादेशिक नियंत्रण कक्ष,**
**कार्टर रोड, बांद्रा पश्चिम, मुंबई- ५०**

**-विवेचन-**

**अपिलाचा दिनांक १ एप्रिल २००९**
**सुनावणीची तारीख दि.२९.५.२००९**
**अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.**

**अपिलार्थी यांनी निर्मलनगर पोलिस स्टेशन येथे दि.२७.१०.२००८ रोजी जी तक्रार केली होती त्या संदर्भात त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६ अन्वये तक्रारीवर केलेल्या कारवाईच्या संदर्भात दि.१८.११.२००८ चा अर्ज (माहिती अधिका-याकडे दि.२०.११.२००८ रोजी प्राप्त) केला होता. प्राप्त अर्जाची चौकशी चालू आहे असे जन माहिती अधिकारी यांनी दि.५.१२.२००८ रोजी अर्जदारास कळविले. अर्जदारास सद्य:परिस्थितीची माहिती दिलेली आहे असे ठरवून त्या प्रकरणातील प्रथम अपिल फेटाळून लावण्यांत आले म्हणून हे व्दितीय अपील सादर केलेले आहे.**

**सुनावणीच्या वेळी अर्जदाराचे व त्यांच्या वकिलांचे असे म्हणणे दिसून आले की, सुप्रीम कोर्ट व हायकोर्टच्या निर्णयानुसार cognizable offence च्या बाबतीत प्रथम माहिती अहवाल हा तात्काळ नोंदणीकृत करायला पाहिजे व अपवादात्मक परिस्थितीत स्टेशन डायरीत नोंद घेऊन दोन दिवसांचे आत चौकशी करुन माहिती अहवाल नोंदविण्याच्या बाबतीत निर्णय घ्यावयास पाहिजे. या प्रकरणात तसे झ ालेले नाही.**

माहितीचा अधिकार अधिनियमानुसार जसे रेकॉर्डला कागदपत्र असतील त्याप्रमाणे माहिती द्यावयाची असते. त्यामुळे चौकशी अजूनहि चालू आहे ही माहिती देण्यांत आली.

तक्रारीचे स्वरुप **cognizable offence**च्या स्वरुपाचे आहे किंवा नाही हे ठरविणे किंवा त्या संस्थेने मुदतीत काम केले आहे किंवा नाही हे पाहून त्याबाबत निर्देश देणे ही माहिती आयोगाच्या अखत्यारितील बाब नाही. याबाबतीत अर्जदाराने वरिष्ठ पोलिस प्राधिकरणाकडे तक्रार करावी. सुनावणीच्या वेळी निर्मलनगर पोलिस ठाणे निरिक्षक यांनी या प्रकरणी विधी सल्लागार यांचे मार्गदर्शन व अभिप्राय घेऊन पुढील कारवाई करीत आहे असे निवेदन दिले.

जन माहिती अधिकारी यांनी रेकॉर्डप्रमाणे वस्तुस्थिती दर्शविणारी माहिती दिली असल्याने पुढील आदेश देण्यांत येत आहे.

**-आदेश-**

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक ८ जून २००९

राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४२९७/०२

श्री.संदिप वसंत बने अपिलकर्ता
ए/१, शिवदर्शन क्रॉस सयानी रोड
प्रभादेवी मुंबई ४०० ०२५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त उत्तरवादी
बृहन्मुंबई महानगरपालिका जी उत्तर विभाग,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर मुंबई २८

जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका जी उत्तर विभाग,
हरिश्चंद्र येलवे मार्ग, दादर मुंबई २८

-विवेचन-

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश देऊनही श्री.संदिप बने यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि.४.३.२००९ रोजी व्दितीय अपील आयागाकडे सादर केले होते. त्यात दि.२०४.२००९ रोजीच्या आदेशाने अर्जदारास १० दिवसांत माहिती देण्यांत यावी, असे निर्देश आयोगाने दिलेले होते. तसेच मुदतीत माहिती न दिल्यामुळे शास्तीची कारवाई कां करण्यांत येऊ नये, याबाबतचा खुलासा जन माहिती अधिकारी यांच्या कडून मागविण्यांत आला होता. जन माहिती अधिकारी हे दि.११ मे २००९ व दि.८.६.२००९ रोजी उपस्थित राहून पुढीलप्रमाणे खुलासा दिलेला आहे.

अर्जदारास दि.६.११.२००८ रोजीच्या अर्जावर दि.६.१२.२००८ रोजी शुल्क भरुन माहिती घेऊन जावी, असे कळविण्यांत आले होते. मात्र अपिलार्थी कार्यालयात उपस्थित राहिलेले नाही. तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळीही अर्जदारास सदरील माहिती घेऊन जाण्याबाबत सांगितले होते. आयोगाकडील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अर्जदाराने दि.२८.५.२००९ रोजी शुल्क भरुन त्यांना हव्या असलेल्या माहितीच्या छायांकित प्रती अंदाजे ८००पृष्ठाचे पैसे भरुन दि.६.६.२००९ रोजी प्राप्त करुन घेतलेल्या आहेत. अर्जदारास माहिती देण्यांत आलेली असल्यामुळे आता शास्तीबाबत आदेश नाहीत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १५ जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/३७९५/०२

श्री.प्रमोदिनी प्रभाकर भडगांवकर — अपिलकर्ता
७, शिलाकुंज, जोगेश्वरी वाडी,
शंकर घाणेकर मार्ग, दादर,
मुंबई ४०० ०२८

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा अधिक्षक — उत्तरवादी
मुंबई नगर भूमापन, जिल्हाधिकारी मुंबई यांचे कार्यालय (भूमापन शाखा)
ओल्ड कस्टम हाऊस,२१ भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०००१

जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.२
मुंबई नगर भूमापन, जिल्हाधिकारी मुंबई यांचे कार्यालय (भूमापन शाखा)
ओल्ड कस्टम हाऊस,२१ भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०००१

-विवेचन-

अर्जदाराने त्यांच्या दि.२२.१.२००८ रोजीच्या अर्जाने फायनल प्लॉट ९६५ टीपी-४ माहिती विभाग,रजिस्टर ३३ पेज नं.६, मुंबई याबाबतीत श्री. गोपीनाथ दाते, सुशिला दाते व श्री.विलास वाय. दाते यांच्या मुलानी दिलेल्या ॲफिडेव्हीडच्या प्रतीची मागणी केलेली होती. त्यांना दि.२५.२.२००८ रोजीच्या पत्राने सदर माहिती कार्यालयात उपलब्ध होत नाही, मात्र नस्तीचा शोध घेण्यांत येऊन आपणांस कळविण्यांत येईल, असे अपिलार्थीस कळविण्यांत आले. या संबंधी केलेल्या प्रथम अपिलावर निर्णय देताना दि.१४.५.२००८ रोजी प्रथम अपिलाच्या सुनावणीत अशा प्रकारचे प्रतिज्ञा पत्र असेल असे अर्जदारास वाटले होते. पण असे कुठलेहि प्रतिज्ञापत्र रेकॉर्डला नाही. भुखंड क्र.९६५ च्या रेकॉर्डला त्यांची नावे नमूद केलेली नाहीत. वरील प्रथम अपिलातील सुनावणी दि.९.५.२००८ रोजी घेण्यांत आली व निर्णयाचे आदेश दि.१४.५.२००८ रोजी आदेश पारित करण्यांत आले होते. प्रथम अपिलाच्या निर्णयाची वाट न पाहता दि.१५.५.२००८ रोजी अर्जदाराने आयोगाकडे अपिल सादर केले होते. त्या अपिलाची सुनावणी आज दि.१८.६.२००९ रोजी घेण्यांत आली व वरील अपिलकर्ते व जन माहिती अधिकारी तसेच अपिलीय अधिकारी उपस्थित होते.

ॲफिडेव्हिड अस्तित्वात नसल्याचा कुठलाही पुरावा नाही. तरी मिळकत पत्रिकेवर अर्जदाराने नमूद केलेल्या व्यक्तींना त्यांचा हक्क कसा मिळाला यासंबंधी जे कागदपत्र असतील त्या कागदपत्राचा शोध घेऊन अर्जदारास दि.४ जुलै २००९ रोजी देण्यांत यावेत असे निर्देश देण्यांत आले. तसेच अर्जदार संबंधित कार्यालयात जाऊन ते माहिती प्राप्त करुन घेण्यास तयार आहेत. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे. उपरनिर्दिष्ट कारवाई करावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४२०/०२

श्री.दिलीप नारायण काणे, — अपिलकर्ता
बी-६०४, युगंधर सुदामा टॉवर,
गावदेवी मंदिराजवळ,मानपाडा रोड,
डोंबिवली पूर्व ४२१ २०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा — उत्तरवादी
एस.एन.डी.टी. वुमेन्स युनिर्व्हसिटी
१ नाथीबाई ठाकरसी रोड,
चर्चगेट, मुंबई ४०० ०२०

जन माहिती अधिकारी तथा
एस.एन.डी.टी. वुमेन्स युनिर्व्हसिटी
१ नाथीबाई ठाकरसी रोड,
चर्चगेट, मुंबई ४०० ०२०

-विवेचन-

अर्जदाराने माहिती अधिकारी, उच्च शिक्षण विभाग यांच्याकडे केलेला अर्ज हा एस.एन.डी.टी. विद्यापीठाकडे पाठविला असल्यामुळे त्या अर्जाच्यासंदर्भात केलेले अपिल तसेच अर्जदाराने माहिती अधिकारी.एस.एन.डी.टी. विद्यापीठ यांचेकडे केलेल्या अर्ज यांचा विषय एकच असल्यामुळे त्याची अपिल सुनावणी एकत्र घेतलेली आहे. अर्जदाराला विद्यापीठाकडून आर्टस्/कॉमर्स डिग्री कॉलेजच्या प्राचार्य पदाच्या नियुक्तीच्या नॉर्म्ससंबंधी माहिती पाहिजे होती व डॉ.मालवणकर यांची नियुक्ती जनरल एज्युकेशन इन्स्टिटयुट वुमेन्स कॉलेज,डोंबिवली येथील प्राचार्य पदी करण्यांत आली त्यांची शैक्षणिक अहर्ता व त्यांचा अनुभव याबाबत माहिती पाहिजे होती.

अर्जदाराने या संदर्भात २-३ अर्ज केलेले आहेत असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे व अर्जदारास दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान न झाल्याने व प्रथम अपिलीय आदेशाचा निर्णय न दिल्यामुळे हे अपिल सादरकरण्यांत आलेले आहे. सदर अपिलाची सुनावणी दि.१८.६.२००९ रोजी आयोगात घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी, प्राचार्य एस.एन.डी.टी.महाविद्यालय हे उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार यातील बरीचशी माहिती ही वेबसाईटवर उपलब्ध आहे व दि.६ ऑक्टोबर २००८ रोजीच्या पत्राने उशिरा कां होईना माहिती देण्यांत आलेली आहे. यासंबंधी अर्जदारचे मत जाणून घेतल्यानंतर अंतिमतः असे दिसून आले की, डॉ.मालवणकर यांच्या अनुभवाच्या संदर्भात जे काही कागदपत्र उपलब्ध असतील त्याच्या प्रती विद्यापीठाने अर्जदारास दिलेले नाहीत. विद्यापीठाच्या म्हणण्यानुसार प्राचार्य पदाची नेमणूक होत असताना अर्ज हे कॉलेजच्या मॅनेजमेंटतर्फे मागविले जातात व त्याची स्क्रुटनी ही त्यांच्याकडूनच केली जाते व अशी स्क्रुटनी व जी कॉलेजकडून केली जाते व जी विद्यापीठास पाठविण्यांत आली असेल ती माहिती अर्जदारास सात दिवसांचे आत देण्यांत यावी, असे निर्देश देण्यांत आले.

माहिती उशिरा देण्याचे कारण फार मोठया प्रमाणात त्यांचे विभागात माहितीचे अर्ज येतात हे दर्शविण्यांत आलेले असले तरी विद्यापीठाने त्याप्रमाणात जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी नेमावयास पाहिजे. अपिल अर्जाची संख्या जास्त होत असल्यामुळे अपिलीय अधिका-यास मुदतीत अपिलाचा निर्णय देणे शक्य होत नसल्यास एका पेक्षा जास्त अपिलीय अधिकारी नेमण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरु यांनी आढावा घेणे आवश्यक आहे. सदर अपिलाबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या विलंब क्षमापित करण्यांत येत आहे. मात्र या विलंबाच्या कारणाबाबत तातडीने पाऊले विद्यापीठाने उचलावित.

सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १७ जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४१९/०२

श्री.दिलीप नारायण काणे, अपिलकर्ता
बी-६०४, युगंधर सुदामा टॉवर,
गावदेवी मंदिराजवळ,मानपाडा रोड,
डोंबिवली पूर्व ४२१ २०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा सहसंचालक(उच्च शिक्षण) उत्तरवादी
एलफिस्टन टेक्नीकल विदयालय, मनपा मार्ग मुंबई

जन माहिती अधिकारी तथा सहसंचालक(उच्च शिक्षण)
एलफिस्टन टेक्नीकल विदयालय, मनपा मार्ग मुंबई

-विवेचन-

अर्जदाराने माहिती अधिकारी, उच्च शिक्षण विभाग यांच्याकडे केलेला अर्ज हा एस.एन.डी.टी. विद्यापीठाकडे पाठविला असल्यामुळे त्या अर्जाच्यासंदर्भात केलेले अपिल तसेच अर्जदाराने माहिती अधिकारी.एस.एन.डी.टी. विद्यापीठ यांचेकडे केलेल्या अर्ज यांचा विषय एकच असल्यामुळे त्याची अपिल सुनावणी एकत्र घेतलेली आहे. अर्जदाराला विद्यापीठाकडून आर्टस्/कॉमर्स डिग्री कॉलेजच्या प्राचार्य पदाच्या नियुक्तीच्या नॉर्म्ससंबंधी माहिती पाहिजे होती व डॉ.मालवणकर यांची नियुक्ती जनरल एज्युकेशन इन्स्टिटयुट वुमेन्स कॉलेज,डोंबिवली येथील प्राचार्य पदी करण्यांत आली त्यांची शैक्षणिक अहर्ता व त्यांचा अनुभव याबाबत माहिती पाहिजे होती.

अर्जदाराने या संदर्भात २-३ अर्ज केलेले आहेत असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे व अर्जदारास दिलेल्या माहितीने अर्जदाराचे समाधान न झाल्याने व प्रथम अपिलीय आदेशाचा निर्णय न दिल्यामुळे हे अपिल सादरकरण्यांत आलेले आहे. सदर अपिलाची सुनावणी दि.१८.६.२००९ रोजी आयोगात घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी, प्राचार्य एस.एन.डी.टी.महाविद्यालय हे उपस्थित होते.

जन माहिती अधिकारी यांच्या म्हणण्यानुसार यातील बरीचशी माहिती ही वेबसाईटवर उपलब्ध आहे व दि.६ ऑक्टोबर २००८ रोजीच्या पत्राने उशिरा कां होईना माहिती देण्यांत आलेली आहे. यासंबंधी अर्जदारचे मत जाणून घेतल्यानंतर अंतिमतः असे दिसून आले की, डॉ.मालवणकर यांच्या अनुभवाच्या संदर्भात जे काही कागदपत्र उपलब्ध असतील त्याच्या प्रती विद्यापीठाने अर्जदारास दिलेले नाहीत. विद्यापीठाच्या म्हणण्यानुसार प्राचार्य पदाची नेमणूक होत असताना अर्ज हे कॉलेजच्या मॅनेजमेंटतर्फे मागविले जातात व त्याची स्क्रुटनी ही त्यांच्याकडूनच केली जाते व अशी स्क्रुटनी व

कॉलेजकडून केली जाते व जी विद्यापीठास पाठविण्यांत आली असेल ती माहिती अर्जदारास सात दिवसांचे आत देण्यांत यावी, असे निर्देश देण्यांत आले.

माहिती उशिरा देण्याचे कारण फार मोठया प्रमाणात त्यांचे विभागात माहितीचे अर्ज येतात हे दर्शविण्यांत आलेले असले तरी विद्यापीठाने त्याप्रमाणात जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी नेमावयास पाहिजे. अपिल अर्जाची संख्या जास्त होत असल्यामुळे अपिलीय अधिका-यास मुदतीत अपिलाचा निर्णय देणे शक्य होत नसल्यास एका पेक्षा जास्त अपिलीय अधिकारी नेमण्यासाठी विद्यापीठाचे कुलगुरु यांनी आढावा घेणे आवश्यक आहे. सदर अपिलाबाबत जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी केलेल्या विलंब क्षमापित करण्यांत येत आहे. मात्र या विलंबाच्या कारणाबाबत तातडीने पाऊले विद्यापीठाने उचलावित.

सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे   वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १७ जून  २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४२१/०२

श्री.दिलीप नारायण काणे, अपिलकर्ता
बी-६०४, युगंधर सुदामा टॉवर,
गावदेवी मंदिराजवळ,मानपाडा रोड,
डोंबिवली पूर्व ४२१ २०१

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा उत्तरवादी
जनरल एज्युकेशन इन्स्टिटयुट,
व्दारा छबिलदास बॉईज हायस्कूल
दादर, मुंबई

जन माहिती अधिकारी तथा
जनरल एज्युकेशन इन्स्टिटयुट,
व्दारा छबिलदास बॉईज हायस्कूल
दादर, मुंबई

-विवेचन-

श्री.दिलीप नारायण काणे यांनी दि.१८ डिसेंबर २००८ व्दितीय अपील सादर केले त्या अपिलाची सुनावणी दि.१८.६.२००९ रोजी घेण्यांत आली त्यावेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास जनरल एज्युकेशन इन्स्टिटयुट, डोंबिवली येथील महाविद्यालयाच्या प्राचार्य पदावर नियुक्त झालेल्या डॉ.सीमा मालणकर यांच्या नियुक्तीच्या संदर्भात बरीच माहिती पाहिजे होती. अर्जदाराचा अर्ज व दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता अर्जदारास माहिती देण्यास संस्थेच्या कार्यवाहने प्रयत्न केला आहे. कोणत्या माहितीने समाधान झाले नाही असे विचारले असता, अर्जदारास अनुभवाच्या संदर्भात माहिती प्राप्त झालेली नाही असे अर्जदाराने सांगितले. तेव्हा अनुभवा संदर्भात जे

कागदपत्र संस्थेमध्ये उपलब्ध असतील ते देण्याचे संस्थेच्या जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले आहे. त्याप्रमाणे ७ दिवसाचे आत जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

संस्थेचे म्हणणे असे की,ते जर माहितीच्या अधिकाराचे पालन करीत असले तरी त्यांच्या संस्थेस हा कायदा लागू नाही असे त्यांची धारणा आहे. या धारणाच्या संदर्भात त्यांनी त्यांच्या संस्थेच्या संदर्भात गेल्या ३-४ वर्षाचे ऑडीट अकाऊंट ची प्रत आयोगास सादर केल्यास उच्च शिक्षण विभागाचे अभिप्राय घेऊन याबाबत निर्णय घेणे आयोगास सोयीचे होईल त्याप्रमाणे संस्थेने कार्यवाही करावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १७ जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४२२/०२

श्री.जया मुदन्ना कुंभार
साईप्रसाद चाळख्, डवरी गेट क्र.४
खोली क्र.१५२/१८, सांताक्रुज पूर्व
मुंबई ५५

अपिलकर्ता

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा पोलिस उपआयुक्त
झोन-९ वांद्रे पश्चिम मुंबई ५०

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलिस आयुक्त
पश्चिम नियंत्रण कक्ष वांद्रे पश्चिम मुंबई ५०

-विवेचन-

अपिलाचा दिनांक ७.१०.२००८
सुनावणीचा दिनांक १८.६.२००९
अपिलाथी व जन माहिती अधिकारी उपस्थित.

अर्जदारास वाकोला पोलिस ठाणे येथील एन.सी. क्र.३६१६/०८ या गुन्हया संदर्भात ९ मुद्यांवर माहिती पाहिजे होती ही माहिती त्यांच्या दि.२९.७.२००८ रोजीच्या अर्जानुसार पाहिजे होती. अर्जदारास हव्या असलेल्या मुद्यांवर व रेकॉर्डमध्ये उपलब्ध असलेली माहिती दि.२४.९.२००८ रोजी देण्यात आली. त्या माहितीने समाधान न झाल्यामुळे केलेल्या प्रथम अपिलीय आदेशात दिलेली माहिती योग्य आहे असे दर्शवून अपिल फेटाळण्यांत आले. त्याविरुध्द सदरचे अपिल दाखल केलेले आहे.

आयोगाकडे सादर केलेल्या व्दितीय अपिलात अर्जदाराने काही नविन मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. त्यासाठी हवे तर त्यांनी नविन अर्ज करावा. मुळ अर्जाच्या बाबतीत पोलिस स्टेशनला

उपलब्ध असलेल्या रेकॉर्डप्रमाणे सर्व माहिती देण्यांत आलेली आहे असे दिसून आले. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १७ जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४२३/०२

श्री.मारुती सिताराम साळुंखे व
श्री. प्रभाकर विष्णू चव्हाण
शिवप्रसाद सह.गृ.नि.संस्था,इमारत क्र.११, खोली क्र.००६ — अपिलकर्ता
शिवसेना नगरी शाखा क्र.१ जेरबाई वाडिया रोड शिवडी, मुंबई. ४०० ०१५

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी संचालक — उत्तरवादी
अभ्युदय सहकारी बॅक के.के.टॉवर, अभ्युदय बॅक लेन,
ऑफ जी.डी.आंबेकर रोड, परळ गांव, मुंबई ४०० ०१२

जन माहिती अधिकारी तथा वरिष्ठ व्यवस्थापक
अभ्युदय सहकारी बॅक शिवडी शाखा,
नवनिधी इंडस्टिड्यल इस्टेट, अे.डी.मार्ग शिवडी मुंबई ४०० ०१५

-विवेचन-

श्री.मारुती सिताराम साळुंखे व श्री. प्रभाकर विष्णू चव्हाण यांनी अभ्युदय सहकारी बॅकेकडून काही माहिती मागितली होती व बॅकेला हा कायदा लागू नसल्याचे कारण दर्शवून ही माहिती देण्यास नकार देण्यांत आला म्हणून सदरचे अपिल सादर केलेले आहे.

नागरी अभ्युदय सहकारी बॅक ही मल्टी स्टेट को.ऑप.शेडयुल बॅक आहे. या संस्थेला सरकारचे अर्थसहाय्य नाही. नुकतेच रिट पिटीशन क्र.५६६६/२००७ मध्ये मुंबई हायकोर्ट,नागपूर खंडपीठाने अर्बन को.ऑप.बॅक ही जन प्राधिकरण नाही, असा निर्णय दिलेला आहे. रिझर्व्ह बॅकेचे म्हणणे तसेच आहे. महाराष्ट्र राज्य सरकारचे म्हणणे सुध्दा त्याचप्रमाणे आहे. तसेच या आयोगाने सुध्दा अपिल क्र.२२५ मध्ये विटा मर्चट को.ऑप अर्बन बॅकेसही हा कायदा लागू नाही व ही बॅक जन प्राधिकरण नाही असा निर्णय दिलेला आहे. तसेच दि.४ मार्च २००९ रोजीचे अपिल

क्र.सीआयसी/पीबीसी/२००७.००३५९-एसएन दि.२२.१२२००६ मध्ये (श्री.मोहम्मद उस्मान विरुध्द को.ऑप बॅक लि.)सुध्दा पिपल्स को.ऑप बॅक ही मल्टी स्टेट बॅक आहे. ज्यावर केंद्र शासनाचे नियंत्रण नाही व त्यास भरीव आर्थिक अनुदान सहाय्य नाही म्हणून बॅक जन प्राधिकरण नाही असा निर्णय दिलेला आहे.

वरील सर्व बाबीचा विचार करता, अभ्युदय को.ऑप बॅक ही जन प्राधिकरण नाही या निर्णयाप्रत आयोग आलेले आहे. त्यामुळे अर्जदारास हवी असलेली कोणतीही माहिती अधिकार अधिनियमान्वये मिळू शकत नाही. मात्र अर्जदार बॅकेचे सभासद असतील तर त्या कायदयानुसार ते माहिती मिळविण्याचा प्रयत्न करु शकतात. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

-आदेश-

अपिल अमान्य करण्यांत येत आहे.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४१८/०२

श्री.सखाराम नागेश मराठे, — अपिलकर्ता
बी/३ आसरा, गुलमोहर रोड,
चुनाभट्टी सायन, मुंबई ४०००२२

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी(टी अॅन्ड सी डिव्हिजन) — उत्तरवादी
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा पूर्व मुंबई ५१

जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार (टी अॅन्ड सी डिव्हिजन)
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
बांद्रा कुर्ला कॉम्पलेक्स, बांद्रा पूर्व मुंबई ५१

-विवेचन-

माहिती अर्जाचा दिनांक ९.९.२००८ माहिती दिल्याचा दिनांक ६.१०.२००८
प्रथम अपिलाचा दिनांक २३.१०.२००८ प्रथम अपिलाचे आदेश दि. १९.१०.२००८
व्दितीय अपिलाचा दिनांक २०.१.२००९ व्दितीय अपिलाचा सुनावणी दि.१८.६.२००९

अर्जदारास इर्स्टन एक्सप्रेस हायवे च्या रुंदीकरणात तोडलेली झाडे नविन लावलेली झाडे वगैरे बाबत माहिती पाहिजे होती. अर्जदारास रेकॉर्डप्रमाणे माहिती दिलेली आहे. पण अर्जदाराचे समाधान प्रत्यक्ष कृतीने होणार असल्यामुळे त्यांना दिलेल्या माहितीने समाधान झालेले नाही म्हणून व्दितीय अपील सादर केलेले आहे असे दिसून आले.

सुनावणीच्या वेळेला जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, हा प्रोजेक्ट मुंबई महानगर प्राधिकरणातर्फे जॉईट प्रोजेक्ट डायरेक्टर टाऊन प्लॅनिगच्या अखत्यारित येतो. अर्जदाराचे समाधान करण्याच्या दृष्टीने सदरील जागेची अर्जदारासोबत पाहणी करुन अर्जदाराच्या अनेक सूचना जाणून घेतलेल्या आहेत व त्याबाबत कार्यवाही चालू आहे. अर्जदाराचा विशेष आग्रह की, सदरील रस्ता रुंदीकरणासाठी जी झाडे तोडण्याची परवानगी देण्यांत आली होती त्याच्या रिप्लेमेंटसंबंधी योग्यती कार्यवाही एम.एम.आर.डी. ने केलेली नाही. याबाबत जॉईट प्रोजेक्ट डायरेक्टर हे लक्ष घालीत असल्याबाबत आयोगाला सांगितले. रेकॉर्डप्रमाणे माहिती देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसतो. तसेच अर्जदाराचे समाधान होण्याच्या दृष्टीने त्यांच्याबरोबर प्रत्यक्ष कामाची पाहणी केलेली आहे. सबब पुढील आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक १९ जून २००९ — राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४२७/०२

श्री.स्नेहांका वसंत चिंदरकर, — अपिलकर्ता
अे-२३/१८१ प्रबोधन स.गृ.नि.संस्था,
एम.आय.जी.कॉलनी, सिध्दार्थ नगर रोड,२
गोरेगांव (पश्चिम)मुंबई १०४

प्रथम अपीलीय प्राधिकारी — उत्तरवादी
मिळकत व्यवस्थापक (४)
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ
वांद्रे (पूर्व),मुंबई ५१

जन माहिती अधिकारी
मिळकत व्यवस्थापक (४)
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळ
वांद्रे (पूर्व),मुंबई ५१

**-विवेचन-**

श्रीमती स्नेहांका व. चिंदरकर यांनी आयोगाकडे दि.२८.१.२००९ रोजी सादर केलेल्या अपिलाची सुनावणी दि.१८.६.२००९ रोजी घेण्यांत आली. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित होते.

अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती:-

न्यू.सि.न.पबोधन स.गृ.नि.संस्था (म)इ.क्र.२१,२२,२३, एम.आय.जी.कॉलनी सिध्दार्थ नगर रोड नं.२ गोरेगांव (प)मुंबई ४०० १०४ या संस्थेतील गाळा क्र.२३/१७७ च्या मुळ गाळेधारकांचे तपशिल व संस्थेच्या अभिहस्तांरणाचे कागदपत्र तपशिल माहिती मिळणेबाबत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती  अधिकारी यांनी पुढील निवेदन दिले.

"सदरील अर्जदाराचा मुळ अर्ज हा दि.१८.१०.२००८ चा असून त्यास दि.१७.२.२००९ रोजी संस्थेस अभिहस्तांतरण झालेले असून गाळेधारकाचे मुळ नस्त्या दप्तरी दाखल असल्याने त्या नस्तीचा शोध सुरु आहे. नस्ती प्राप्त होताच आपणांस कळविणेत येईल व अपिलार्थीनी मागविलेली माहिती तपशिल अ,ब,क,ड बाबत कळविणेत येईल असे कळविले होते.

तद्नंतर याबाबत कार्यालयाने दि.१२.६.२००९ रोजी परिपत्रक काढून नस्तीचा शोध कार्यालयाकडील वेगवेगळया विभागीय कार्यालयात नस्तीचा शोध घेऊन १५ दिवसांत या कार्यालयास सादर करावा असे सूचित केले होते.  परंतू अद्याप अहवाल प्राप्त नाही.

तसेच जन माहिती अधिकारी कार्यालयाने जा.क्र.१६९६ दि.१२.६.२००९ रोजीच्या पत्रान्वये सदर नस्तीचा शोध चालू असून कागदपत्रे उपलब्ध होताच तात्काळ देण्याची तजविज ठेवली आहे असे अपिलार्थीस कळविले होते. सदरचे पत्र प्रत्यक्ष कार्यालयीन शिपाई दि.१७.६.२००९ रोजी अपिलार्थीस पोच करण्यासाठी गेले होते.परंतू सदरचे पत्र घेण्यास अपिलार्थीने नकार दिला.

तसेच दि.१८.१.२००८ च्या पत्रातील मुद्दा क्र.क,ड,ई बाबतचे कागदपत्रे पैसे भरुन घेऊन जाणेबाबत कळविणेत येत आहे. तरी वरील बाबी विचारार्थ घेता नस्ती शोध घेणे होणा-या विलंबास क्षमस्व. "

वरील विवेचनावरुन असे दिसून येते की, अर्जदारास पाहिजे असलेल्या माहिती पैकी अभिहस्तांतरणाबाबतची माहिती आता उपलब्ध झालेली आहे. ती अर्जदाराने दि.२६.६.२००९ रोजी सकाळी ११.००वाजता जन माहिती अधिकारी कार्यालयात जाऊन प्रत्यक्ष कागदपत्राची पाहणी केल्यानंतर  अर्जदार ज्या कागदपत्राची निवड करतील त्या कागदपत्राच्या प्रती विनामुल्य देण्याबाबत निर्देश देणेत येत आहेत.  जरी अर्जदाराने नमूद केलेल्या गाळयाच्या मुळ अलॉटमेंटची नस्ती जरी बरीच जुनी असली तरी ती शोधून काढण्याचा प्रयत्न करावा व माहिती देण्याचा प्रयत्न करावा. सबब पुढील प्रमाणे आदेश देण्यांत येत आहेत.

**-आदेश-**

अपिल निकाली काढण्यांत येत आहे   वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १९ जून  २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/४४२६/०२

श्री.पुष्कराज प. शिरधनकर — अपिलकर्ता
प्लॅट नं.१०, इमारत क्र.११ २ रा मजला,
इंडियन एअर लाईन इमारत, चिराग हॉटेलसमोर
सावसकर मार्ग, विरार पूर्व जि.ठाणे ३ ४०१ ३०३

प्रथम अपीलीय प्राधिकारी सहायक — उत्तरवादी
मनपा आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका
जी/उत्तर विभाग कार्यालय, दादर पश्चिम मुंबई

जन माहिती अधिकारी व.वसाहत अधिकारी
मनपा आयुक्त,बृहन्मुंबई महानगरपालिका
जी/उत्तर विभाग कार्यालय, दादर पश्चिम मुंबई

-विवेचन-

अपिलाचा दिनांक २०डिसेंबर २००८
सुनावणीचा दिनांक १८.६.२००९
अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित.
अर्जदारास पुढील माहिती पाहिजे होती :-

फाईल क्र.एस.आर.ए./इंजि./११५३/जी एन/एम.एल./एल.ओ.आय

डॉ.बाबासाहेब आंबेडकर नगर एस.आर.ए.गृहनिर्माण संस्था रजि. क्र. चे मुख्य प्रवर्तक गणपत कृष्णा बनसोडे आणि आपल्या कार्यालयामार्फत ३० जानेवारी २००६ रोजी संमत करण्यांत आलेल्या परिशिष्ट II मध्ये आज दि.८ जुलै २००८ रोजी पर्यत नावामध्ये केलेला बदल अपात्र रहिवाशांना पात्र करुन परिशिष्ट II मध्ये त्यांचे नांव समाविष्ट केले गेले असल्यास किंवा नावामध्ये व इतर अद्याक्षरामध्ये

असलेले चुकीचे नाव दुरुस्ती आणि ट्रान्सफर केसेस मध्ये केले गेलेल्या सर्व बदल्यासहीत आज दिनांक पर्यत केले गेलेल्या सर्व बदलासहित संमत करण्यांत आलेल्या परिशिष्ट ІІ ची प्रमाणित प्रत मिळणेबाबत.

वरील माहिती मिळण्यासाठी अर्जदाराने दि.१४.८.२००८ रोजी पैसे भरुनही त्यांना माहिती देण्यांत आलेली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे त्यांनी १३.८.२००८ रोजी अर्जदारास माहिती दिली होती. पण प्रत्यक्ष कागदपत्राचे अवलोकन केल असता १३ तारखेला जी प्रत मिळाली म्हणून अपिलार्थीने सही केलेली आहे ती माहितीची प्रत नसून पैसे भरण्यासंबंधीचे पत्र आहे असे निष्पन्न झाले. कारण दि.१४.८.२००८ रोजी पैसे भरलेn त्यामुळे त्या अगोदरच माहिती दिली जाणार नव्हती. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना असे निर्देश देण्यांत येत आहे की, दि.१९.६.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता अपिलार्थीस सर्व माहिती देण्यांत यावी.

माहिती देण्यास कुचराई केल्याबाबत जन माहिती अधिकारी यांचेवर रु. १००००/- एवढी शास्ती लादण्यांत येत आहे. ही शास्ती जन माहिती अधिका-याचे ऑगस्ट २००९ रोजीच्या पगारातून वसूल करावी व शासनाने विहित केलेल्या लेखाशिर्षाखाली जमा करावी. या आदेशाची प्रत ही महापालिका आयुक्त यांना कार्यवाहीसाठी व प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनाही देण्यांत यावी. सबब पुढीलप्रमाणे आदेश देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल मान्य करण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

या आदेशाची प्रत ही महापालिका आयुक्त व प्रधान सचिव, नगर विकास विभाग यांनाही देण्यांत यावी

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक १८ जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३)  अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/३१४४/०२

श्री.रजनिश शिवाजी कांबळे — अपिलकर्ता
१/१९, वरळी बी.डी.डी.चाळ, गणपत जाधव मार्ग,
वरळी, मुंबइ्र १८

प्रथम अपीलीय प्राधिकारी व्यवस्थापक — उत्तरवादी
बी.डी.डी. चाळ यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
वरळी, मुंबई १८

जन माहिती अधिकारी व.वसाहत अधिकारी
बी.डी.डी. चाळ यांचे कार्यालय,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
वरळी, मुंबई १८

-फेर आदेश-

दि.२०.११.२००८ रोजी  वरील आदेशामध्ये जन माहिती अधिका-यानी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांच्यावर शास्ती कां लादण्यांत येऊ नये, याचा खुलासा करण्यास सांगितले होते. त्यांचा खुलासा दि.२९.६.२००९ रोजी ऐकून घेण्यांत आला.  अर्जदाराचा दि.२०.९.२००७रोजीच्या अर्जास दि.२०.१०.२००७ पर्यत अर्जदारास माहितीबाबत कळविणे आवश्यक होते. पण माहिती तयार आहे व त्याचे शुल्क किती होते याबाबत कुठलेही पत्र जन माहिती अधिकारी यांनी  अर्जदारास पाठविलेले नाही.  दि.२९.६.२००९ रोजी दिलेल्या खुलाशात जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे की,अपिलकाराने आवश्यक माहिती व्यक्तीशः मागितलेली होती व ती स्विकारण्यासाठी अर्जदार कार्यालयात उपस्थित न राहिल्यामुळे सदर माहिती त्यांना देता आली नाही.  जर व्यक्तिशः माहिती घेऊन जाईल असे लिहिले तरी माहिती तयार आहे. परंतू त्याचे शुल्क किती होते हे अर्जदारास कळवावयास

पाहिजे. त्यामुळे माहितीच्या अधिकारातील अंमलबजावणीबाबत जन माहिती अधिकारी यांनी अभ्यास न केल्यामुळे अनभिज्ञ राहिलेले दिसून येते. त्यामुळे अर्जदारास माहिती पासून वंचित रहावे लागले. याबद्दल मात्र माहिती देण्यात विलंब हा अनभिज्ञतेमुळे झालेला असून त्या मागे कुठलाही गैर हेतू नाही. त्यामुळे पूर्ण मुदतीची शास्ती न लावता फक्त रुपये २५००/- एवढी शास्ती लादण्यांत येत आहे. ही शास्ती जन माहिती अधिकारी यांचे माहे ऑगस्ट २००९ रोजी येणा-या वेतनातून वसूल करुन ती शासनाच्या विहित बजेट हेड खाली जमा करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता यांनी करावी व अनुपालन अहवाल ७ दिवसाचे आत राज्य माहिती आयोगास कळवावा. तसेच वरील आदेशाची प्रत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच मुख्य अभियंता, मुंबई विभाग यांनाही पाठवावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)

दिनांक २९ जून २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/६२१/०२

श्री.नरेंद्र बारकू चौधरी अपिलकर्ता
बाफना मार्केट तळमजला,
मनपा समोर, धुळे

प्रथम अपीलीय प्राधिकारी कार्यकारी अभियंता उत्तरवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग,जळगांव

जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव

-विवेचन-

अपिलाचा दिनांक २९.८.२००८
सुनावणीचा दिनांक २५/२६ मे २००९

अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचा प्रतिनिधी तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित.

अपिलार्थीनी दि.१५.५.२००८ च्या अर्जान्वये भडगांव उपविभागांतर्गत झालेल्या कामाच्या संबंधात कामाचे नांव, अंदाजपत्रकीय तरतूद, प्रत्यक्ष खर्च, कामाची सद्यःस्थिती कामावर देखरेख करणा-या अधिका-यांचे नांव इत्यादि माहिती मागितली हाती. त्यांना दि.१७.६.२००८ च्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली. तथापि माहिती अपूर्ण असल्याचे कारण नमूद करुन अपिलार्थीनी दि.९.७.२००८ रोजी प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलावरील सुनावणीच्या वेळी असे स्पष्ट करण्यांत आले की, अपिलार्थीना पूर्ण माहिती पुरविण्यात आली आहे. अपिलार्थीचे म्हणणे असे होते की, माहिती पुरविण्यास विलंब झालेला असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचेवर दंडात्मक कार्यवाही व्हावी. दंडात्मक कार्यवाहीचे अधिकार प्रथम अपिलीय अधिकारी यांना नसल्यामुळे अपिलार्थीची मागणी फेटाळण्यांत आली. प्रथम अपिलावरील निर्णयाने समाधान न झाल्यामुळे

दंडात्मक कारवाईची मागणी करीत अपिलार्थींनी दि.२९.८.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

यावरील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांना ८ मुद्यांची पूर्ण माहिती दिल्याचे निदर्शनास आणून दिले. एकाच मुद्यावरील माहिती मुदतीनंतर विनाशुल्क उपलब्ध करुन दिल्याचे स्पष्ट केले. अपिलार्थींना माहिती मिळाली असल्याने खालीलप्रमाणे आदेश देण्यांत येतात.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे

(डॉ.सुरेश वि.जोशी)
दिनांक ३० जून २००९ राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/६६१/०२

श्री.राजे पंडीत दलाल अपिलकर्ता
प्लॉट नं.२७, सर्व्हे नं.२५-१-अ-१
विद्युतप्रभा सोसायटी जवळ,
विद्यानगरी पोस्ट ऑफीस, देवपूर
जि.धुळे ४२४००५

प्रथम अपीलीय प्राधिकारी गट विकास अधिकारी उत्तरवादी
पंचायत समिती धुळे, जि. धुळे

जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक
ग्रामपंचायत वळवाडी ता.जि.धुळे

-विवेचन-

अपिलाचा दिनांक ३.२.२००९
सुनावणीचा दिनांक २६ मे २००९
अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित तसेच जन माहिती अधिकारी उपस्थित.

"श्रीमती धनश्री चुडामण पवार यांच्या पीठाच्या गिरणी संबंधात ग्राम पंचायत ठरावाची प्रत, यावर घेतलेल्या हरकतीच्या प्रती, गिरणी मंजूर करताना घातलेल्या अटी व शर्थी "

माहिती न मिळाल्याने अपिलार्थींनी दि.१.११.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. यावर दि.१८.११.२००८ रोजी सुनावणी झाली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिका-यांनी अपिलार्थींना असे सांगण्यांत आले की, अपिलार्थींनी मागितलेली कागदपत्रे उपलब्ध होताच अपिलार्थींना देण्यांत येतील. तथापि कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थींना प्राप्त झाल्या नाहीत. यास्तव अपिलार्थींनी दि.३.२.२००९ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

अपीलावरील सुनावणीचे वेळी सर्व कागदपत्राच्या प्रती सादर करण्यांत आल्यात व त्या अपिलार्थीना त्वरीत देण्याचे आदेश देण्यांत आलेत. तृतीय पक्षाचे म्हणणे त्यांची गिरणी बंद करु नये, कारण त्यांनी कर्ज घेतले आहे व त्यांची परतफेड करणे मुश्किल होईल. याबाबतीत आयोग दखल घेऊ शकणार नाही. हा निर्णय ग्रामपंचायत किंवा त्यावरील सक्षम प्राधिकरण यांनी घ्यावयाचा आहे.

-आदेश-

अपिल निकाली काढण्यांत येत आहे

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० जून २००९

मुख्य माहिती आयुक्त,महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपिल क्रमांक २००९/५९०/०२

श्री.यादव बाबुलाल बुवा (पत्रकार) — अपिलकर्ता
प्रकाशा रोड, पटेल टेन्टच्याजवळ
शहादा जि. नंदूरबार ४२५४०९

प्रथम अपीलीय प्राधिकारी उपअभियंता — उत्तरवादी
पंचायत समिती बांधकाम विभाग,
तालुका अक्कलकुवा जि.नंदूरबार

जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,
पंचायत समिती बांधकाम विभाग,
तालुका अक्कलकुवा जि.नंदूरबार

-विवेचन-

अपिलाचा दिनांक २०.८.२००८
सुनावणीचा दिनांक २५/२६ मे २००९
अपिलार्थी तसेच प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित.

अपिलार्थीनी दि.२३.६.२००८ रोजीच्या अर्जान्वये उपविभागांतर्गत राबविण्यांत येणा-या कामांची सविस्तर माहिती मागविली होती. यात कामाचे नांव, अंदाजित खर्च, मंजूरीचा आदेश, कामावर आठवडे निहाय मजुरांची उपस्थिती इत्यादि माहितीचा अंतर्भाव होता. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी दि.४.८.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले. तथापि यावर सुनावणी झाली नाही तसेच अपिलार्थीना माहिती मिळाली नाही. यास्तव अपिलार्थीनी दि.२०.८.२००८ रोजी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले.

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते. अपिलार्थीचे म्हणणे ऐकून घेण्यांत आले. सदर प्रकरणी असे निर्देश देण्यांत येतात की, जन माहिती

अधिकारी यांनी अपिलार्थीना सदर आदेशाच्या दिनांकापासून १५ दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

सुनावणीस जन माहिती अधिकारी उपस्थित नाहीत व माहितीहि दिलेली नाही. त्यामुळे त्यांचेवर रुपये १००००/- ची शास्ती लावण्यांत येत आहे. ती ऑगस्ट व सप्टेंबर २००९ महिन्याच्या पगारातून वसुल करुन शासनाने विहित केलेल्या बजेट हेड खाली जमा करावी व आयोगास तसा अनुपालन अहवाल पाठवावा. तसेच अपिलीय अधिका-यांनी अपीलावर कुठलाहि निर्णय दिला नाही. ही कृति योग्य नाही. त्याबद्दल त्यांना समज देण्यांत येत आहे.

-आदेश-

अपिल मान्य करण्यांत येत आहे. वर निर्देशिल्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत यावी.

(डॉ.सुरेश वि.जोशी)
राज्य मुख्य माहिती आयुक्त

दिनांक ३० जून २००९